: प्रकरण सहावे :

# उपसंहार

प्रकरण सहावे :

# उपसंहार

## ६.१. प्रास्ताविक :

रा. रं. बोराडे हे व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार ह्या ग्रामीण कथाकारांनंतरचे ग्रामीण कथाकार होत. ग्रामीण कथाकार म्हणून त्यांची सामाजिकतेच्या दृष्टीने वैशिष्टयपूर्णता कोणती आहे, हे शोधण्याचा प्रयत्न ह्या प्रबंधिकेत केला आहे.

ग्रामीण कथाकारांच्या कथांमधून ग्रामीण जीवनचित्रणाचे विविध पैलू चित्रित होणे अपेक्षित असते. ग्रामरचनेमध्ये शेती हाच व्यवसाय, शेतीशी निगडीत घटक, शेतकरी व बलुतेदार ह्यांचे संबंध, तेथे असणारी जातीय व्यवस्था अथवा गरीब - श्रीमंत, श्रेष्ठ - कनिष्ठ असा जातींमधील परस्परसंबंध, कुटुंबव्यवस्था, माणसाच्या विविध नात्यागोत्याचे संबंध ह्यामधून ग्रामीण जीवनाची वैशिष्टये स्पष्ट होत असतात. बोराडे हे जाणीवपूर्वक ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे कथाकार होत. त्यांच्या कथांमधून दिसून येणारे समाजचित्रण, ग्रामजीवन, तेथील परिसर वेगवेगळया अंगाने आणि व्यापक, सूक्ष्म व सखोल कसे आहे, ह्याचा शोध घेण्याचा प्रयत्न मी ह्या प्रबंधिकेत केलेला आहे. ह्या संदर्भात अन्य ग्रामीण कथाकारांहून बोराडे ह्यांच्या कथालेखनाची काही वेगळी वैशिष्टये आहेत का, ह्याचाही शोध घेण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.

## ६.२-प्रबंधिकेतील निष्कर्ष व निरीक्षणे :

पहिल्या प्रकरणामध्ये मराठी कथेची वाटचाल आणि तिच्यातील ग्रामीण कथाकारांचे योगदान ह्याचा विस्ताराने विचार केला आहे. मराठी कथावाङ्मयाच्या जन्मखुणा प्राचीन काळात खूप मागे सापडतात. ह्या कथावाङ्मयाचा अलिखित स्वरूपातील जन्मकाळ तर ह्याही खूप पाठीमागे जातो. म्हणजे जेव्हा आदिमानवाची निर्मिती झाली, त्याच वेळी मानवाबरोबर कथांचाही जन्म झालेला दिसतो. परंतु लिखित स्वरूपातील कथावाङ्मयाची जन्मखूण शोधता तेराव्या शतकातील केशिराजबासलिखित 'दृष्टांतपाठ' हे मराठी कथावाङ्मयाचे पहिले पुस्तक गृहित धरावे लागते.

कथा हा साहित्याचा काव्याइतकाच प्राचीन प्रकार असून काव्य हे कथात्मक स्वरूपाचे होते. अध्यात्म व नीतिबोध हेच ह्या कथांचे मूळ उद्दिष्ट होते. ह्या कथांना दैवतकथा म्हणून संबोधले जाते. ह्या दैवतकथा विविध धर्मातील पुराणे व तत्कालीन धार्मिक ग्रंथांमधून समाविष्ट केलेल्या आहेत. सर्वसामान्यांच्या दृष्टीने ह्या दैवतकथांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ह्या कथा पुढे आल्या व त्या लोकांच्या कुतुहलाचा नव्हे, तर श्रध्देचाही विषय बनल्या.

इ.स. १८०० ते १८८५ ह्या काळात मराठी कथावाङ्मयाने गद्यरूप धारण केले. कथा गद्यात अवतरतानाच मोजक्याच, परंतु महत्त्वाच्या भाषांतरित कथांची सरशी होती. त्यामध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकर व स.का. छत्रे ह्यांनी भाषांतरित कथा लिहिल्या. ह्या कालखंडात कथा बाळबोध व अद्‌भुत अशा स्वरूपाच्या होत्या.

इ.स. १८८५ ते १९२५ ह्या काळात ह.ना. आपटे ह्यांनी कथेला अद्‌भुततेच्या जोखडातून मुक्त करून तिला वास्तवस्पर्शी बनवले व लौकिक स्वरूप मिळवून दिले. ह्या कालखंडातील कथांचे उद्दिष्ट केवळ मनोरंजन, केवळ करमणूक हेच असलेले दिसून येते. असे असले, तरीही ह्याच कालखंडात दिवाकर कृष्णांनी कथेकडे एक कलाप्रकार म्हणून पाहिले व तिला अधिक कलात्मक व वास्तव बनविले.

इ.स. १९४५ ते १९६० ह्या काळात गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी अस्सलतेकडे, वास्तवतेकडे झेपावणाऱ्या मराठी कथेला अधिक सूचक आणि आत्मगर्भ बनविले. ह्या काळात 'सत्यकथा' व 'अभिरूची' ह्या नियतकालिकांनी ह्या नवकथाकारांना प्रकाशात आणण्याचे कार्य केले. ह्याच दरम्यान दि. बा. मोकाशी, श्री. ज. जोशी, हमीद दलवाई हे नवकथाकार पुढे आले. अर्थात् नवकथेचे वारे वाहू लागले, तिचा विकास झाला. नवकथेचे आद्यप्रवर्तक गंगाधर गाडगीळ ह्यांची 'तलावातले चांदणे' सारखी कथा मानवी मनाचा आणि मानवी मनातील विसंगतींचा सूक्ष्म आणि सखोल अर्थ शोधू लागली, पु. भा. भाव्यांची 'सतरावे वर्ष', तर व्यंकटेश माडगूळकरांच्या 'गावाकडच्या गोष्टी' ह्या कथांनी पारंपरिक कथेला आशयसंपन्न व संस्कारशील बनवले.

१९६० नंतर रा. रं. बोराडे - आनंद यादव ते द.ता. भोसले ह्यांच्यापर्यंत जे जे म्हणून कथाकार पुढे आले, त्यांनी नवकथेच्या विकासाचा पुढचा टप्पा समृध्द करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मराठी ग्रामीण कथेला अंत:स्पर्शी, जिवंत प्रोत्साहन, जातिवंत तळमळ आणि सृजनशीलता मिळवून देण्याचे कार्य ह्या कथाकारांनी अतिशय तळमळीने केले. १९६० नंतरचा कथेचा विकास अधिक सकस, प्रयोगक्षम आणि कलासंपन्न झालेला दिसतो तो ह्या कथाकारांच्या कृतिशीलतेमुळेच.

एकूण मराठी कथावाङ्मयाच्या उदय आणि वाटचालीवरून नजर टाकल्यानंतर मराठी कथावाङ्मयाला स्वत:चा असा फार जुना इतिहास लाभलेला आहे, त्याचबरोबर कथावाङ्मयाला वैभवशाली परंपराही लाभलेली आहे, हेच दिसते.

मराठी ग्रामीण कथावाङ्मयाला खऱ्या अर्थाने १९२५ पासून सुरूवात झाली. त्या काळात ग्रामीण साहित्याच्या प्रेरणाही वेगळ्याच स्वरूपाच्या होत्या. १९२५ नंतर ग्रामीण आणि नागर असा भेद कथेमध्ये जाणवू लागला. 'ग्रामीण साहित्य' ही मूल्यवाचक संज्ञा नव्हे, तर वर्णनपर संज्ञा आहे, ग्रामीण मनाचे जीवनचित्रण ज्या साहित्यातून प्रामुख्याने येते, त्यालाच ग्रामीण साहित्य असे म्हटले जाते. ग्रामीण कथेचा अस्सलपणा ज्याला म्हणतात तो हाच. केवळ कथेतील तपशील ग्रामीण असले की कथा ग्रामीण होत नाही. ग्रामीण साहित्याच्या अस्सलपणाचा प्रत्यय ग्रामीण संवदेनशीलतेच्या अंगाने घेणेच योग्य ठरते.

१८८७ च्या दुष्काळाचे चित्रण करणारी 'काळ तर मोठा कठीण आला' ही हरिभाऊंची 'स्फुट गोष्ट' ग्रामीण कथेची जन्मखूण मानली जाते. ग्रामीण कथेची सुरूवातच वास्तवातून झाली. साधारणत: १९३० - ३१ मध्ये सुखठणकर - सरदेसाई ह्यांनी प्रामुख्याने जनसामान्यांच्या प्रबोधनासाठी कथा लिहिल्या. ही गांधीवादाच्या प्रभावाची खरी सुरूवात होती. नंतर पुढे ग. ल. ठोकळ व र. वा. दिघे ह्यांनी ग्रामीण जीवनचित्रणाबरोबरच कथेतून काव्यात्मकता व अतिरंजितता आणली. पुढे श्री. म. माटे ह्यांनी मात्र अपेक्षितांच्या जीवनात खोलवर बुडी मारून 'उपेक्षितांचे अंतरंग' उलगडून पाहिले व त्यातील 'माणुसकीचा गहिवर' किती अनावर आहे, हेही दाखवून दिले. ते ग्रामीण कथेचे जनक मानले जातात.

ग्रामीण कथेच्या कसदारपणाचे, ग्रामीण जीवनाच्या सर्वांगाचे दर्शन कलात्मकतेने घडविण्याचा स्तुत्य प्रयत्न व्यंकटेश माडगूळकरांनी प्रथम केला. शंकर पाटील ह्यांनीही ग्रामीण समाजजीवनातील माणसांची मने, विशेषत: स्त्रियांचा अगतिकपणा शब्दबध्द केला. कुटुंब कथा लिहून शंकर पाटलांनी आपला इतर साहित्यिकापेक्षा वेगळा गुण सिध्द केला. तसेच ह्या गंभीर प्रयत्नाबरोबरच द.मा. मिरासदारांनी ग्रामीण भागातील किस्से, हकीकती, रंगवून सांगितल्या. कथेच्या मार्गातील एका वेगळ्या वळणाचे दर्शन मिरासदारांनी घडवून दिले. आनंद यादवांनी कथेला अधिक काव्यमय बनवले व तिला स्वगताचे रूप दिले आणि कथा पूर्णपणे ग्रामीण बोलीतच लिहून एक नवा रस्ता अवलंबिला.

रा. रं. बोराडे, सखा कलाल, उध्दव शेळके, महादेव मोरे व चारूता सागर ह्यांनी आपआपल्या प्रदेशातील माणसांना, त्या त्या प्रदेश वैशिष्टयांना व त्यांच्या व्यथांना शब्दात पकडून कथेचे रूप दिले. त्यांचा विशेष असा की, ग्रामीण बोलीभाषेतच त्यांनी आपल्या कथेमधील व्यक्तिरेखाचित्रणाला गडद केले. ह्या व्यक्तिरेखाचित्रणाच्या स्वाभाविक अंगानेच त्यांच्या कथा प्रकट होऊ लागल्या.

दुसऱ्या प्रकरणामध्ये 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील कथांमधील अनुभवविश्व, त्याचे स्वरूप व वैशिष्टये ह्यांचे सविस्तर विवेचन केले

आहे. ह्या प्रकरणाच्या प्रास्ताविकामध्ये बोराडयांचा परिचय करून दिला आहे. नंतर त्यांच्या साहित्याची प्रेरणा व एकूण त्यांची साहित्यसंपदा ह्या गोष्टींचा विचार केला आहे. तसेच कथालेखनातील अनुभवविश्वाचा अधिक व्यापक व विस्ताराने विचार केला आहे. लेखक कोणत्याही कालखंडातील असो, कोणत्याही वाङ्मयप्रकारातून निर्मिती करणारा असो, त्याच्या निर्मितीमध्ये त्याच्या जीवनानुभवांना महत्त्वाचे स्थान असते, त्याने जे भोगले, अनुभवले व सोसले, तेच आणि त्याच्या आसपासच्या घडणाऱ्या घटनाप्रसंगांवरच तो लिहीत असतो. तसेच आजुबाजूचे वातावरण व संस्कार· ह्यातूनच त्याची जीवनानुभूती समजते. तो आपल्या साहित्यातून जीवनदर्शन घडविताना समाजजीवनातील एखाददुसरा नाटयात्मक प्रसंग पकडून त्याला कथेत गुंफण्याचे धाडस करतो. तसेच त्याचा प्रत्येकाच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ठरलेला असतो. अशा व्यवहारातून लेखक आपले अनुभवविश्व व जीवनविषयक नैतिक मूल्ये ह्यांचा पुरस्कार करत असतो व त्यातूनच त्याचे अनुभवविश्व साकारत जाते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अनुभवविश्वाचा विचार 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्याबाबतीत स्वतंत्ररीत्या केला आहे.

'पेरणी'(१९६२) ह्या बोराडयांच्या पहिल्या कथासंग्रहामधील अनुभवविश्व पाहता सर्वच्या सर्व म्हणजे १४ कथांमधून ग्रामीण माण्सांच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी व त्यामागील अर्थ गांभीर्याने शोधण्याचा त्यांचा प्रयत्न लक्षात येतो. प्रामुख्याने बोराडे माणसांचाच शोध घेतात. मग ही माणसे कोणत्याही स्तरातील असोत. त्यांच्या जीवन जगण्याच्या पध्दतीचा खोलवर तळ त्यांनी शोधलेला दिसतो. ही माणसे नियतीपुढे काहीशी हतबल ठरलेली दिसतात. त्यामुळे बोराडयांच्या काही कथा अनुभवाच्या दृष्टीने गंभीर वाटतात. 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहामधील कथा ह्या प्रामुख्याने कौटुंबिक अनुभवविश्वातून साकार झाल्या आहेत. ह्या अनुभवविश्वातून बोराडयांची अनुभव घेण्याची समृध्दता, विचार करण्याची परिपक्वता, मूल्यांची व आदर्शांची जपणूक करण्याची वृत्ती जाणवते. एकंदर, ह्या कथासंग्रहामधील अनुभवविश्व रसिकांना आपलेच वाटते.

'कणसं आणि कडबा' ( १९९४) ह्या कथासंग्रहातील अनुभवविश्वाचा विचार करता, ह्या संग्रहातील सर्वच्या सर्व म्हणजे २० कथांमधून मराठवाडयाचे व्यापक जीवन व त्या जीवनाचा सविस्तर व सूक्ष्म वेध घेतलेला दिसतो. ह्या कथांमधूनही बोराडे मानवी जीवनाचा गंभीरपणे विचार करताना जाणवतात. तसेच मानवी जीवनाचा एकएक पदर उलगडून दाखवतात हेही जाणवते. मानवाच्या हतबलतेचे व अगतिकतेचे दर्शन त्यांनी ह्या अनुभवविश्वातून घडविले आहे. सारे मानवी जीवनच एक प्रकारच्या दुर्बलतेने व्यापून गेले आहे, त्यातून कोणी सुटलेला नाही, तो परिस्थितीचा गुलाम आहे, भोवतालची परिस्थिती तो बदलू शकत नाही, उलट तो परिस्थितीला शरण गेलेला आहे. हे आपले

आकलन बोराडे जवळजवळ सर्वच कथांमधून मांडताना दिसतात त्यांची कथा उत्कंठा वाढवणारी व खिळवून ठेवणारी आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेच्या ह्या तिसऱ्या प्रकरणामध्ये रा. रं. बोराडे ह्यांचा कथांमधील व्यक्तिरेखांचा विचार केला आहे. विवेचनाच्या सोयीसाठी बोराडयांनी चित्रित केलेल्या व्यक्तिरेखांचे दहा विभागांमध्ये वर्गीकरण केले आहे. त्यात विरहाच्या दाहकतेमुळे शोकाकुल होणाऱ्या, पुत्रप्रेमासाठी तळमळणाऱ्या, प्रादेशिक समस्यांशी झुंज देणाऱ्या मराठमोळेपण जपणाऱ्या, राजकीय सत्तासंघर्षात ईर्षेला पेटलेल्या, श्रध्दा - अंधश्रध्दा जोपासणाऱ्या, शोषक आणि शोषित असणाऱ्या, बालमनोविश्वाचे दर्शन घडविणाऱ्या, सुशिक्षित बेकारीचे चटके सहन करणाऱ्या व मुके प्राणी हे ते व्यक्तिरेखांचे दहा विभाग होत. ह्या वर्गीकृत व्यक्तिरेखांचे सविस्तर विवेचन ह्या प्रकरणात केले आहे. बोराडयांनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखांच्या ह्या चित्रणामध्ये बाह्यांगावर भर नाही, तर व्यक्तिरेखांच्या अंतर्मनाचे दर्शन घडविण्यावर भर आहे. ह्या विवेचनातून वर्गीकृत केलेल्या व्यक्तिरेखा ह्या त्या त्या विभागाचे वैशिष्ट्य व अस्सल मराठमोळेपण जपताना जाणवतात. एकूणच कथांमधील अनुभव प्रत्ययकारी करण्यासाठी बोराडयांनी त्या भागातीलच व्यक्तिरेखांचा अवलंब केलेला दिसतो. तसेच त्यांच्या कथांमधून आविष्कृत होणाऱ्या जीवन दृष्टीचा प्रत्येय त्यांच्या कथांमधून चित्रित झालेल्या व्यक्तिरेखा देतात. अशा ह्या व्यक्तिरेखांच्या सामर्थ्यातून बोराडयांच्या कथालेखनाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू दृष्टीस पडतात.

प्रबंधिकेच्या चौथ्या प्रकरणामध्ये रा. रं. बोराडयांच्या कथांमधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली ह्यांचा सविस्तर विचार केला आहे. कथेच्या घटकांचा अभ्यास करताना कथानक व व्यक्तिरेखा ह्या घटकांबरोबरच वातावरण किंवा स्थलकालनिर्मितीलादेखील अनन्यसाधारण महत्त्व असते. ह्या घटकांमुळेच कथेचे सौंदर्य वाढत जाते, कथेला स्थैर्य प्राप्त होते व कथेतील घटनाप्रसंग आणि व्यक्तिरेखांचे स्वभाव ह्यांच्यातील संबंध स्पष्ट होतो. विवेचनाच्या सोयीसाठी वातावरणनिर्मिती करणाऱ्या घटकांचे वर्गीकरण करून त्यातील एकेका घटकातून वातावरणनिर्मिती कशा प्रकारे केली आहे, ह्याचे सविस्तर विवेचन केले आहे. ह्या घटकांमध्ये प्रामुख्याने कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, बालमनाच्या चमत्कारिकपणातून निर्माण होणारे वातावरण इ. घटकांचा विचार केला आहे. ह्या घटकांच्या साहाय्याने बोराडयांनी जिवंत स्वरूपाचे वातावरण कथांमधून चित्रित केले आहे.

वातावरणनिर्मितीबरोबर भाषाशैलीचाही विचार ह्या प्रकरणात केलेला आहे. ग्रामीण कथेचे भाषा हे एक महत्त्वाचे अंग आहे. ग्रामीण बोली ही ग्रामीण माणसाच्या जीवनाच्या अभिव्यक्तीचे एक साधन असते. ग्रामीण बोलीने मराठी भाषा समृध्द व संपन्न केली आहे, तिच्यात नवनवे संकेत सुचविले

आहेत. भाषा ही जशी मानवी भावभावनांचे प्रकटन करीत असते, त्याचबरोबर भाषेतून विचारांचा वारसा पिढयान् पिढया संक्रमित होतो. भाषेतून सांस्कृतिक भेद कळतात, संस्कृतीची काळाची माहिती मिळते.

एकूणच रा. रं. बोराडयांच्या भाषाशैलीमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भाषाशैलीशी तुलना करता, फारसा वेगळेपणा आढळत नाही. मात्र त्यांनी कथेत योजलेले संवाद व संवादातून केलेला ग्रामीण भाषेचा वापर ह्यामुळे त्यांच्या कथावस्तुंचा उत्तम परिपोष त्यांच्या कथेत झालेला दिसतो. निवेदने भाषाशैलीने खास नटलेली आहेत. त्यामुळे कथेतील अनुभव ज्या निवेदनशैलीतून प्रकट होतात, त्यांची स्वतंत्रपणे आपण चव घेत राहतो. त्यामुळे त्यांच्या कथेत निवेदनशैलीला एक खास मूल्य प्राप्त होते. ग्रामीण भाषेच्या कुशल वापरामुळे कथा अधिक कलात्मक कशी बनली, ह्याचेही आकलन होण्यास ह्या प्रकरणातील विवेचनाची मदत होईल.

पाचव्या व शेवटच्या प्रकरणामध्ये रा. रं. बोराडे ह्यांचे मराठी कथावाङ्मयातील स्थान स्पष्ट केले आहे. बोराडयांच्या 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन्ही कथासंग्रहांमधून ग्रामीण समाजजीवन साकार झाले आहे. ह्या दोन्ही कथासंग्रहांमधील कथा अस्सल ग्रामीण जीवनाचा प्रत्यय देणाऱ्या असल्याने ग्रामरचनेचे स्वरूप, समूहमनाची रचना असणारी खेडी, कृषिप्रधानता व शेती हा व्यवसाय ह्यांचे स्वरूप पाहणे अगत्याचे ठरते. ह्या सर्व बाबींचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात 'ग्रामीण संवेदनशीलता' ह्या मुद्याच्या अनुषंगाने केले आहे. शेती पूर्णपणे निसर्गावर असलंबून असते. त्यामुळे शेतकरी जीवन जगणाऱ्यांना दारिद्रय आणि उपासमार ह्यांना सतत तोंड दयावे लागते. तसेच खेडयांची रचनाही मोठया कुटुंबाची असते. त्यामुळे तेथे पितृसत्ताक कुटुंबपध्दतीला महत्त्व असते.

बोराडे मराठवाडयाच्या मातीतून समर्थपणे उदयाला आलेले व सर्वात यशस्वी असे बी. रघुनाथांनंतरचे कथाकार होत. कथेच्या क्षेत्रात त्यांनी आपले स्थान अढळ करून मराठी कथेच्या समृध्दीत मोलाचे योगदान दिले. मराठी कथेपुरता विचार करता प्रादेशिक अगर ग्रामीण अशा जीवनाचे चित्रण करीत असताना आपणास बोराडे ह्यांचे कथालेखन ग्रामीण समाजजीवनातील अनेक विषयवैविध्यातून पुढेपुढे सरकत आलेले दिसते. त्यांच्या कथांबाबतच्या विवेचनातून काही वैशिष्टये विशेषत्वाने दिसून येतात. त्यामध्ये उत्कट व अस्सल ग्रामीण संवेदनशीलता, समर्थपणे ग्रामीण स्त्रियांच्या समस्यांचे चित्रण, गांभीर्यपूर्वक सामाजिक समस्यांचे चित्रण, कौटुंबिक ताणतणाव व भावनिक नातेसंबंधाचे उत्कट चित्रण, मुक्या प्राण्याच्या वेदनांचे बोलके चित्रण, लैंगिक आकर्षण व

भावनिक कोंडमारा ह्याचे उत्कृष्ट चित्रण, बालमनोविश्वाचे वैविध्यपूर्ण चित्रण, राजकारणाचा आणि गुंडगिरीचा खरपूस समाचार व विनोदाचा वानवळा काही वेगळाच अशा विविध कथावैशिष्टयांना आणि विविध विषयांना त्यांच्या कथेने स्पर्श केला आहे. म्हणूनच मराठी कथावाङ्मयामध्ये बोराडयांचे स्थान अद्वितीय असलेले दिसते. मात्र ग्रामरचनेतील समाजजीवनाचे व्यापक चित्रण त्यांच्या कथांमधून येत नाही. दारिद्रय, स्त्रियांचे कुचंबलेपण, पुरूषांची असाहाय्यता, भीषण दुष्काळी स्थिती ह्यांचे चित्रण बोराडे करतात. पण व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या कथेत दिसणारे सर्वव्यापी दारिद्रय बोराडे मांडू शकले नाहीत. आयुष्यभर इमानेइतबारे राबणारा धर्मा रामोशी आयुष्याच्या अखेरच्या काळात दारिद्रयाने आणि उपासमारीने गलितगात्र होतो. भल्याभल्यांना जिथे भ्रांत पडली आहे, तिथे आपले दु:ख कसे मांडावे, ही त्याची अगतिकता आहे. बायजासारख्या तरण्या मुलीला शरीररक्षणासाठी (लज्जारक्षणासाठी) पुरूषांची वस्त्रे परिधान करण्याची वेळ येते. कारण घरात नेसण्याइतपत वस्त्रे नाहीत, हा दारिद्रयाचा बळी. त्यामुळे ती घराबाहेर पडू शकत नाही. अब्रूदार, पण गरीब कुळात जन्मलेल्या रघू कारकुनाची बायको दारिद्रयापोटीच अनीतीच्या वाटेने जाणे पसंत करते. एखाद्या शिवा माळ्याला चोरी करावीशी वाटते. ह्या सर्व प्रकाराचे असे टोकदार अनुभव बोराडयांच्या कथेत दिसत नाहीत. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधील जातिव्यवस्था व व्यक्तिविविधताही बोराडयांच्या कथेत सापडत नाही. माडगूळकरांच्या कथेमध्ये जातीयतेचा उलगडलेला जो विस्तृत पट आहे, तसा विस्तृत पटही बोराडयांच्या कथेत दिसत नाही. माडगूळकरांच्या कथेत अल्पसंख्यांक व बहुसंख्याक, स्पृश्य व अस्पृश्य, बलुतेदार व फिरस्ते ह्यांचे संबंध चित्रित करणाऱ्या विपुल कथा आहेत. बोराडयांच्या कथेत मात्र तसे दिसत नाही.

बोराडे प्राधान्याने कुटुंबाचेच चित्रण करताना दिसतात. हेच त्यांचे खरे अनुभवविश्व आहे. शंकर पाटील ह्यांनीही कुटुंबकथा लिहिल्या. पण शंकर पाटलांची कथा शहरी नवकथेच्या वळणाची वाटते. व्यक्तिमनांची, त्यातही स्त्रियांची भावांदोलने चित्रित करणे, ह्यावरच पाटील अधिक भर देतात. त्यामुळे पाटलांच्या कथेत सामाजिकता अल्प प्रमाणात येते. पण बोराडे ह्यांच्यासमोर समाजजीवनाचा विस्तृत पट असतो. शेतकरी, त्याची नातीगोती, दारिद्रय, दुष्काळ, सुगीचे दिवस, हलाखीचे दिवस ह्यांचाही समाजजीवनावर कसा परिणाम होतो, ह्याचे चित्रण बोराडे सुरेखपणे करतात. पाटलांच्या कथेत हे पहावयाला मिळत नाही. बोराडे हेही कुटुंबकथाच लिहीत असले, तरीही त्याला सामाजिक पार्श्वभूमी आहे. त्यामुळे शंकर पाटलांप्रमाणे बोराडे ह्यांची कथा व्यक्तिकेंद्रित होत नाही. ती सामाजिकतेचा पैलू असलेली कुटुंबकथा होते. ग्रामीण जीवनातील ढोबळ दु:खांच्याही पलीकडे जी अनेकपदरी सूक्ष्म दु:खे

आहेत, त्यांचे आकलन बोराडे ह्यांना आहे, हे मान्य करावे लागते. सामाजिकतेचे यर्थाथ आकलन बोराडे ह्यांना आहे, हेच त्यांचे ग्रामीण कथाकार म्हणून वेगळेपण मान्य करावे लागेल.

## ६.३. समारोप :

एकूणच रा. रं. बोराडे ह्यांच्या कथासृष्टीचा, त्यांच्या सामर्थ्याचा, त्यांच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचा आणि मर्यादांचा विचार केल्यानंतर असे लक्षात येते की, ग्रामीण कथेच्या क्षेत्रात त्यांचे स्थान अतुलनीय असे तर आहेच, पण त्याचबरोब्र मध्यवर्ती अशा मराठी कथेच्या क्षेत्रातही त्यांचे स्थान महत्त्वाचे असे आहे. मराठी कथेच्या समृध्दीत त्यांच्या कथालेखनाचा वाटा निश्चितच खूप मोठा आहे. म्हणूनच साठोत्तरी मराठी कथालेखन जाणून घेताना रा. रं. बोराडयांचे कथालेखन जाणून घेतल्याशिवाय पुढे जाताच येणार नाही, असे शेवटी निश्चितपणे म्हणता येते.

----------: ❁❁❁❁❁ :----------